hastkala Life
WOVEN BY CULTURE

30 YEARS

हस्तकला लाईफच्या पुढील
पुरवणीच्या मजकुरासाठी
संपर्क : साक्षी साबळे - 93240 14616
ऐश्वर्या म्हैसकर - 91580 61923

VOLUME: 01 | ISSUE : 10 | July 2025 | 8 PAGES

Managing Editor : Nikhil Ballal

Supported by ठाणेवैभव



Pravin
CHHEDA
CHAIRMAN, HASTKALA

# WHEN ART IS IN THE AIR.....

If saree is an expression of beauty, then the art that comes wrapped in it, tends to become more divine and serene. We at Hastkala are celebrating the rejuvenating monsoon with the equally refreshing personalities of the city who have carved a niche for themselves in the world of art. A cultural hub that Thane is, these amazing artists from various fields stand for each colour of the rainbow. Never has been the horizon of the city so beautiful and we stand in unison to appreciate them.

Thanekars have been connoisseurs of art and the culturally rich fabric glows with their performances. Some of them have even mesmerised the audiences abroad. The national and international luminaries who have been highlighted in Hastkala Life represent the huge talent that is being groomed for future. Hastkala encourages such talents and to keep the tempo going we also bring reputed vocalists, dancers, musicians and many others to show their skills. Priyanka Barve, the heart throb of avid music lovers is one such personality whom Hastkala has brought to enrich the crowd. We believe that only good artists can inspire and encourage upcoming good ones. We are glad to be interlocutors for a good cause. For us Anandghana is nothing but happiness raining.

# ‘आई शप्पथ’ अभिनयाशी माझा 'पवित्र रिश्ता'

## ग्लॅमरच्या झगमगाटातही प्रामाणिकपणाने उभी–अभिनेत्री मानसी साळवी



**झगमगत्या मनोरंजनविश्वात जेथे सतत प्रकाशझोतात राहण्याची धडपड चाललेली असते आणि जिथे प्रत्येक गोष्ट काळजीपूर्वक रंगवली जाते, तिथेही काही व्यक्तिमत्त्व अशी असतात की जी आपल्या साधेपणा, सच्चेपणा आणि स्थिरतेमुळे उठून दिसतात. मानसी साळवी हे नाव त्यापैकीच एक. ती केवळ एक अभिनेत्री नाही, तर मितभाषी, समजूतदार आणि ग्लॅमरच्या आभासी जगातही खऱ्या अर्थाने प्रामाणिकपणे उभी राहिली आहे.**

छोट्या पडद्यावरचा हा प्रसिद्ध चेहरा अभिनयाच्या प्रवासात अगदी लवकरच नावारूपाला आला. वयाच्या अवघ्या १७-१८ व्या वर्षीच, एका छोट्याशा जाहिरातीद्वारे मानसी साळवी हिने अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. "व्हीम डिटर्जंटची एक छोटी जाहिरात होती, पण त्यानंतर सगळं काही बदलून गेलं," असं ती हसत सांगते. ही जाहिरात जरी छोटी असली, तरी याच क्षणापासून तिच्या कारकिर्दीला दिशा मिळाली. यानंतर 'आशीर्वाद' ही टेलिव्हिजन मालिका तिच्या आयुष्यात आली आणि तिथून सुरू झाला एका प्रतिभावान अभिनेत्रीचा प्रवास, ज्याने मराठी आणि हिंदी दोन्ही टेलिव्हिजन इंडस्ट्रीत आपल्या सशक्त अभिनयाने आपली वेगळी ओळख निर्माण केली.

मुलींमध्ये अभिनयाची स्वप्न पाहणं ही काही आजची गोष्ट नाही. पण मानसी साळवी हिचं स्वप्न वेगळं होतं. अर्थशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या मानसीला सुरुवातीला कॉर्पोरेट जगतात स्थिर आणि शिस्तबद्ध करिअर करायचं होतं. संरचना, विचार आणि व्यवस्थापन यात तिला गती होती. पण नियतीने तिला एका वेगळ्याच मार्गावर नेलं ते म्हणजे अभिनयाच्या जगात. या क्षेत्रात तिने केवळ अभिनय केला नाही, तर तो आत्मसात केला. ‘असंभव’, ‘खेळ मांडला’, ‘आई शप्पथ’, ‘काय घडलं त्या रात्री’, ‘गुम है किसी के प्यार में’, ‘पवित्र रिश्ता’ अशा एकाहून एक दर्जेदार मालिकांमधून तिने आपले अभिनय कौशल्य दाखवले.

अनेक वर्ष भारतीय प्रेक्षकांसाठी ती एक ओळखीचा आणि विश्वासार्ह चेहरा ठरली. ‘पवित्र रिश्ता’ या गाजलेल्या मालिकेत तिने काम केलं. पण मानसीची सर्वात लक्षवेधी भूमिका ठरली ती म्हणजे स्टार प्लसवरील ‘प्यार का दर्द है मीठा मीठा प्यारा प्यारा’ या मालिकेतील ‘अवंतिका’. ही भूमिका पारंपरिक आईच्या चौकटीत बसणारी नव्हती. ‘अवंतिका’ एक महत्त्वाकांक्षी, निर्णयक्षम, चुकणारी पण शिकणारी स्त्री होती.

| पान ३ वर

# Celebrating the Golden Jubilee of Dancing Bliss

At the tender age of three, when children barely start to run, Vaishali Irani, daughter of Daran Behram Reporter, set the stage on fire with her eye-pleasing dance moves. Her elder sister, Madhumati, was a famous and well-trained dancer who introduced Vaishali to this beautiful world of dancing.

Vaishali elucidates, “I undertook formal training in Kathak and Bharatanatyam from Pandit Bhimraj and Guru Kalyan Raman Pillai, respectively. I became an accomplished dancer at the start of my teenage. I was hardly 12-13 years old when I had my first tryst with the silver screen, thanks to Rajshree, former Hindi film actress and daughter of V Shantaram, who offered me my first work in a movie that was shot in Rajkamal Studio.”

She adds, “I vividly remember when my mother and I visited V Shantaram’s office for the first time. When my mother dug into her bag to take out my photographs, Shantaramji quickly said that his eyes are like a camera. Your daughter is selected for my movie.”



Vaishali Irani

**To date, she has done thousands of shows in India and abroad. With movies and many stage shows to her credit, Vaishali hung up her boots as she tied the knot with her family friend Sarosh Irani, the owner of Prabhat Talkies in Thane, to unfurl a new beginning. Sitting at home was never an option, so Irani decided to take her passion to a new height.**

“I signed the contract the very next day,” exclaims Vaishali. 52 other girls went through screen testing, but to her delight, she was the one who made it straight to the movie sets without any screen test. The title of the film was Boond Jo Ban Gaye Moti.

| Pg. 6







# शुभदा विद्वंस : शब्द आणि न्यायाचा सेतू

शब्द आणि न्याय या दोन वेगवेगळ्या वाटा, परंतु दोन्हीचा गाभा आहे संवाद आणि समज. या दोघांमधला सेतू होण्याचा प्रयत्न माझ्या जीवनाचे सार ठरले. वाचनाच्या ओढीपासून सुरू झालेला प्रवास, इंग्रजी साहित्याच्या प्रेमातून पुढे गेला आणि शेवटी मुलांच्या हक्कासाठी लढणाऱ्या व्यवस्थेचा एक सक्रिय भाग बनला, असे अधिवक्ता शुभदा विद्वंस सांगतात.

साहित्यप्रेमी, संवेदनशील आई आणि मुलांच्या उज्वल भविष्याची निस्सीम इच्छाशक्ती असलेली एक कार्यकर्ती. शिक्षण, संसार आणि समाजकार्य या सगळ्यात समतोल राखत, जीवनाच्या प्रत्येक वळणावर मी नवे काही शिकले, अनुभवले आणि समजून घेतले, असे त्या म्हणाल्या.

कधी कोर्टात युक्तिवाद करताना, कधी चाइल्ड वेल्फेअर कमिटीवर निर्णय घेताना, तर कधी अनुवादाच्या शब्दांमधून लोकांपर्यंत विचार पोहोचवताना माझे प्रत्येक टप्प्याचे योगदान हेच सांगते की शब्द असोत किंवा मूलभूत हक्क योग्य दिशा दिली तर ते घडतात, फुलतात.

मी माझा परिचय जर शब्द आणि न्याय यांचा सेतु असा करून दिला तर ते फारसे वावगे होणार नाही, असे मी नम्रपणे सांगू इच्छिते. मी ॲडव्होकेट शुभदा विद्वंस पूर्वाश्रमीची कुलकर्णी. अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव येथेच लहानाची मोठी झाले. पुढे इंग्लिश लिटरेचर हा विषय घेऊन पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकले. लहानपणापासून वाचनाची आवड होती. कौटुंबिक वातावरण त्यासाठी पोषक होते. घरात दर महिन्याला स्त्री, किर्लोस्कर, मनोहर, रीडर्स डायजेस्ट ही पुस्तके तसेच सकाळ, टाइम्स ऑफ इंडिया ही वृत्तपत्रे येत असत. वडील पेशाने डॉक्टर असले तरी साहित्याची त्यांना अचूक जाण होती. नवीन काही वाचले की ते आम्हाला त्याबद्दल सांगत, चर्चा करत. त्यामुळे विनोदाची, मार्मिकतेची जाण लवकर आली. पुढे लग्न करून अहमदनगर म्हणजे हल्लीचे अहिल्यानगर येथे स्थायिक झालो. दोन मुले झाली. शिक्षणाची आवड स्वस्थ बसू देत नव्हती. आधी कॉलेजमध्ये असताना इंग्लिशचे प्रोफेसर व्हावे एवढेच स्वप्न होते. परंतु काळाच्या रेट्यात तेही तग धरु शकले नाही. पती वकील होते म्हणून वकिली करायचे ठरवले. L.L.B झाले सुद्धा, परंतु कोर्टात काही फारसे मन रमले नाही. घर, संसार, मुले याकडे अधिक ओढा होता. आमच्या एका स्नेह्यांनी हे हेरले अणि प्रस्ताव ठेवला, "तुम्ही चाईल्ड वेल्फेअर कमिटीवर काम कराल का?" ते काय असतं हे माहीत नसून सुद्धा मी हो म्हणाले. माझी चाईल्ड वेल्फेअर कमिटीवर अध्यक्षपदी राज्यपालांकडुन नेमणूक झाली. तेथे काम करताना हे प्रकर्षाने जाणवते की आपली मुले फार सुरक्षित अणि सुस्थितीत आहेत.







शुभदा विद्वंस

आपण मुलांची खूप काळजी घेतो. परंतु कमिटीसमोर येणारी मुले ही एकल पालकांची आणि दारिद्र्य रेषेखालील होती. मुलांचे मानसशास्त्र एक अजब चीज आहे. त्यामध्ये प्रचंड गुंतागुंत आहे, चंचलतेच्या बाबतीत ते पाऱ्यालाही मागे टाकेल. कमिटीचा आवाका मोठा असतो. 0 ते 18 वयोगटातील मुले असल्यामुळे आमच्याकडून मुले दत्तक देण्याचेही पुण्य कर्म घडत असे. ही सगळी कामे जुवेलिन जस्टिस कायदा (Juvenile Justice Act) नुसार आम्ही करतो. या कमिटीवर 5 वर्षे काम केल्यानंतर माझी वर्णी जुवेलिन जस्टिस बोर्ड (JUVENILE Justice Board) वर लागली. इथे एक प्रिंसिपल मॅजिस्ट्रेट असतात. 18 वर्षांच्या आतील मुलांनी चूक केली असेल (मुलांच्या दुष्कृत्याला गुन्हा म्हणायचे नाही अणि बाल गुन्हेगाराला आरोपी न म्हणता विधि संघर्षग्रस्त बालक म्हणायचे याचे प्रशिक्षण आम्हाला दिलेले असते.) तर शासनाकडून अनेक कॉन्फरन्स अणि वर्कशॉपचे आयोजन होते ही जमेची बाजू.

मुलांना साध्या वेशातील पोलीस बोर्डासमोर आणले जाते. कोर्ट प्रक्रिया सगळी फौजदारी कोर्टाप्रमाणे चालते. साक्षी - पुरावे होतात. परंतु मुलांना शिक्षा द्यायची नसते. तर त्यांचे पुनर्वसन जास्तीत जास्त चांगल्याप्रकारे कसे होईल याचा विचार करून आदेश द्यायचे असतात. हे सगळे काम मला प्रचंड आवडायचे. मुले म्हणजे मातीचा गोळा. त्याला जसा आकार देऊ तसे ते घडणार. यातूनच सर्जनशीलता आणि संवेदनशीलता यांचा सुरेख मेळ घालण्याची संधी मिळाली. पुढे ठाण्याला आल्यावर सुद्धा ठाणे जिल्ह्याच्या जुवेलिन जस्टिस बोर्डावर 4 वर्ष अणि ठाणे चाइल्ड वेल्फेअर कमिटीवर 4 वर्षे काम करण्याची संधी मिळाली. दोन्ही ठिकाणी प्रचंड काम होते. 50 केसेस दिवसाला डायरीला असायच्या. तसेच केसेस अधिक गंभीर असायच्या. कदाचित काळाचा महिमा आणि मेट्रोसिटी मधील वातावरण यासाठी कारणीभूत असावे असे मला वाटते. या कामासाठी मी कौन्सेलिंगचा डिप्लोमा सुद्धा केला. दरम्यान एक दुर्दैवी वळण आयुष्यात आले. 2001 साली माझ्या पतीचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. आर्थिक बाजू सावरण्यासाठी त्यावेळी कोर्टात पूर्ण वेळ काम करून सर्व केसेस पूर्ण केल्या.

इंग्लिश साहित्याची आवड गप्प बसू देत नव्हती. वाचन चालूच होते. अशातच "Why men don't listen and women can't read maps" नावाचे पुस्तक वाचनात आले. ते इतके आवडले की ते सगळ्यांनी वाचले पाहिजे असा मनाने हट्ट धरला. फारसा विचार न करता त्या पुस्तकाचा अनुवाद केला. त्यासाठी कॉपी राईट, प्रकाशक लागतात याचा विचार केला नव्हता. परंतु मेहता पब्लिशिंग हाऊसकडे ते दिले अणि त्यांना ते इतके आवडले की 2008 मध्ये माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. त्यानंतर आजच्या घडीला माझी 25 पुस्तके बाजारात आहेत. लोक मळलेल्या पायवाटेवरून जातात तशीच मी जात होते. अचानक मला सूर गवसला. डेल कार्नेगी यांची "How to stop worrying....." अणि "How to win friends...." ही अजरामर पुस्तकं माझ्या हातून अनुवादित झाली यासाठी मी देवाचे आभार मानते. आवड म्हणून ज्याची सुरुवात केली ती मिशन बनले. मी मुलांसाठी जे काम केले त्या विषयावर "Roses, daffodils and cactus" हे पुस्तक मी लिहिले आहे.

शब्द माझे जग आहे, मग ते इंग्रजी बेस्टसेलर्स पुस्तके अनुवादित करणे असो किंवा गरजू मुलांच्या हक्कासाठी आवाज उठवणे असो.

# आवड असेल तर सवड काढता येते- वसुधा जोशी






रांगोळी ही भारताची प्राचीन सांस्कृतिक परंपरा आहे. घरातील आनंद, सकारात्मकता, चैतन्य दर्शनवण्यासाठी दारापुढे रांगोळी काढली जाते. हल्ली पारंपरिक रांगोळ्यांबरोबरच आधुनिक शैलींचाही प्रयोग रांगोळीच्या माध्यमातून पाहायला मिळतो. एक कलाकार म्हणून वसुधा जोशी विविध कलाप्रकार आवडीने जोपासतात. त्यातलाच रांगोळी हा कलाप्रकार सहज जमणारा म्हणून त्यांना जवळचा वाटतो.

विविध प्रांतातील रांगोळी शैलींमधून प्रेरणा घेऊन त्यांचे मिश्रण करण्याचा आनंद वेगळाच असतो, असे वसुधाताईंचे मत आहे. रांगोळी आकर्षक व वेगळी दिसावी यासाठी त्या धान्याचे प्रकार, भाज्या व त्यांची सालं, बिया, पाने-फुले, कागद यांसारख्या नैसर्गिक व साध्या वस्तूंचा वापर करून कलाकृती साकारतात. बऱ्याचदा कमीत कमी रंगीत रांगोळी वापरून काचेवर किंवा टाईल्सवर लहान आकारात रांगोळी काढण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

कलाकृती तयार करताना प्रथम तिची कल्पना मनात स्पष्ट होणे आवश्यक असते. विशेष वेळ देणे हे गरजेचे नसते; दैनंदिन कामे करत असतानाही अचानक एखादी कल्पना सुचते आणि मग ती लगेच कागदावर उतरवण्याची प्रेरणा मिळते. 'आवड असेल तर सवड काढता येते,' हे अगदी खरे आहे. सण-उत्सवांचे औचित्य साधून रांगोळी साकारण्याचा नेहमी प्रयत्न होतो. यामधून परंपरा जपण्याचा हेतूही साध्य होतो. आज अनेक उत्तम रांगोळी कलाकार आपली कला सादर करत आहेत. भव्य महारांगोळी ही सण-समारंभांचे मुख्य आकर्षण ठरते, तर वास्तववादी रांगोळी शैली रसिक प्रेक्षकांना मोहून टाकते. या कलाकृतींच्या माध्यमातून आपली संस्कृती नकळत नव्या पिढीत रुजवली जात आहे, असे वसुधाताईंनी सांगितले.



वसुधा जोशी

विशेष दिनानिमित्त तसेच संत, साहित्यिक, ऐतिहासिक आणि विविध क्षेत्रातील थोर व्यक्तींच्या प्रतिमा रांगोळीत साकारताना त्यांच्या कार्याबद्दल आदरभाव व्यक्त करण्याचा हा एक सुंदर प्रयत्न ठरतो. वसुधा जोशी यांनी कधी रांगोळी स्पर्धेत भाग घेतलेला नाही, परंतु कलाशिक्षिका म्हणून विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी मार्गदर्शन करण्याचा अनुभव त्यांना लाभला आहे.

रांगोळी ही केवळ एक सजावट नाही, तर परंपरेचे, आदरभावनेचे आणि सृजनशीलतेचे प्रतीक आहे. तिच्यातून संस्कृतीची सुंदर झलक नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची ताकद आहे.

**डिजिटल रांगोळीचे आकर्षण मान्य आहे आणि सोशल मीडियावर ती पाहताना नवी कल्पना मिळते, पण हाताने तयार होणाऱ्या रांगोळीची मजा आणि समाधान हे काही वेगळेच असते. संदर्भ मिळवण्यासाठी डिजिटल माध्यमांचा उपयोग होतो, पण सृजनशीलतेचा खरा आनंद हा प्रत्यक्ष रंगांमध्ये बोटं बुडवून रांगोळी रेखाटण्यातच आहे, असे वसुधा यांनी सांगितले.**









# गुरुंच्या कृपेने घडलेली एक साधिका

गिरगावच्या सांस्कृतिक वळणावर वाढलेली माझी संगीताची वाटचाल ही केवळ एका कलाकाराची कथा नाही, तर ती आहे एका कुटुंबातल्या प्रेरणेची, गुरुंच्या करुणाशील मार्गदर्शनाची आणि स्वतःच्या जिद्दीची. मोठ्या बहिणीकडून मिळालेली पहिली तालीम, आईच्या अपूर्ण स्वप्नातून मिळालेली स्फूर्ती आणि नंतर लाभलेले दोन्ही हातांनी देणारे गुरु ठुमरी सम्राज्ञी शोभाताई गुर्टू आणि गानयोगिनी धोंडूताई कुळकर्णी यांच्या सहवासातून मला केवळ शास्त्रीय संगीत शिकायला मिळाले नाही, तर ते संगीत 'जगायचं'ही असतं हे शिकायला मिळालं, असं स्मिता भागवत सांगतात.



प्रेम, संसार, नोकरी आणि तितक्याच तळमळीने चाललेला रियाज या साऱ्या गोष्टींचा समतोल साधत एक साधिका म्हणून माझा प्रवास घडत गेला. सुरुवातीला बहिणीकडून शिकलेले सूर, नंतर महान गुरूंनी दिलेले आत्मबोध आणि आज शिष्यांना दिली जाणारी शिकवण हा प्रवास म्हणजे एका वाहत्या, निर्मळ संगीतसरितेचा अनुभव आहे, असे त्या नमूद करतात.

शास्त्रीय संगीताचा प्रवास हा एका साधकाचा, गुरूंच्या आशीर्वादाने आणि स्वतःच्या जिद्दीने घडणारा आहे. मम्मींच्या आणि धोंडूताईंच्या त्या "वाहत्या नदी"त माझे भांडे जेवढे भरले, ते माझ्यासाठीच नव्हे तर माझ्या शिष्यांसाठीही एक अमूल्य ठेव आहे. आज मी शिकवते, त्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात संगीतासाठी आदर आणि आस निर्माण करणे हेच माझे खरे साध्य आहे, असे स्मिता भागवत आवर्जून सांगतात.

शास्त्रीय संगीत हे काळाच्या कसोटीत टिकलेलं असं एक अमूल्य विद्याधन आहे. त्याची खरी चव लागते ती संयम, समर्पण आणि शुद्ध श्रवण या त्रिसूत्रीमधून. हे संगीत कधी काळात मागे पडलेलं नव्हतंच आणि भविष्यातही ते टिकून राहील, कारण ते केवळ कानांना नाही, तर आत्म्याला भिडणारं आहे. आज मी जे काही आहे, ते या सूरांच्या कृपेने आणि गुरुंच्या आशीर्वादाने आहे. मी मूळची गिरगावची. आमच्या कुटुंबात आम्ही तीन बहिणी. माझी मोठी बहीण माझ्यापेक्षा जवळपास ९ वर्षांनी मोठी, त्यामुळे ती माझ्यासाठी आईसमानच होती जणू आदर्श, मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान. तिने शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले होते, पण तिचा सूर अधिक सुगम संगीताला अनुकूल होता. त्यामुळे ती त्या काळात प्रसिद्ध वाद्यवृंदांत गायचा अनुभव घेत होती. आमच्या आईलाही शास्त्रीय संगीताची आवड होती, पण घरची परिस्थिती शिकण्यास पूरक नव्हती. मात्र तिचे प्रोत्साहन आणि ताईचे अनुकरण करत मी गाण्याची वाट धरली.

संगीताचे माझे शिक्षण ताईकडून सुरू झाले. नंतर विविध गुरुंकडून संगीताचे धडे घेत घेत माझा प्रवास पुढे सरकत राहिला. कॉलेजमध्ये वाणिज्य शाखेत शिक्षण चालू असतानाच संगीत नाटके, कॉलेजचे कार्यक्रम, स्पर्धा यांमधून माझे गाणे अविरत सुरू होते. याच काळात माझे प्रेमात पडणे आणि विवाह होणे, हा जीवनप्रवासातला मोठा टप्पा होता. सुदैवाने त्यांच्या घरीही संगीताची आवड होती. गझल, नाट्यसंगीत, उपशास्त्रीय सर्व प्रकार ऐकले जात. त्यामुळे लग्नानंतरही गाण्याला प्रोत्साहन मिळाले. याच प्रेरणेने मी संगीत विशारद पूर्ण केलं आणि मुंबई महानगरपालिकेत संगीत शिक्षिका म्हणून नोकरीला लागले, असे स्मिता ताईंनी सांगितले.



स्मिता भागवत

यानंतर माझ्या आयुष्यात एका अद्वितीय गुरुचा म्हणजेच शोभाताई गुर्टू यांचा प्रवेश झाला. दिवसभर पालिकेची नोकरी करून वरळीला राहणाऱ्या शोभाताईंना मी बोरिवलीहून संध्याकाळी भेटायला जायचे. त्यांच्या शिकवणीत मी जाणले की, आतापर्यंतचे गाणे म्हणजे फक्त प्राथमिक टप्पा होता, खरे शिक्षण आता सुरू झाले होते. त्यांचे गायन म्हणजे एक निर्मळ, खळाळती दैवी नदी. आम्ही त्यांना 'मम्मी' म्हणायचो, त्या आमच्यासाठी आईसारख्याच होत्या. त्यांच्याशी १९९४ ते २००४ पर्यंतचा सहवास हे माझ्या आयुष्यातले सुवर्णपान आहे. मम्मींच्या सांगण्यावरून मी गानयोगिनी धोंडूताई कुळकर्णी यांच्याकडे जायला लागले. त्या बोरिवलीला राहायच्या, त्यामुळे सोयीचे झाले. त्या एक अत्यंत कडक शिस्तीच्या, स्पष्टवक्त्या आणि समर्पित गुरु होत्या. एकीकडे शोभाताईंची प्रेमळ, प्रवाही शैली आणि दुसरीकडे धोंडूताईंची तपश्चर्येची उंची हे दोन्ही अनुभव माझ्या शिक्षणाचे आधारस्तंभ बनले. धोंडूताईंनी मला 'सुरमणी' स्पर्धेसाठी भाग घ्यायला सांगितले. मी दचकले, "अजून वर्षभरही पूर्ण नाही झालं माझं शिक्षण!" पण त्यांनी आत्मविश्वास दिला, "मी तुझ्याकडून करून घेईन." त्यांनी 'भूप' रागावर वर्षभर काम करून घेतले आणि माझे सादरीकरण एवढे यशस्वी झाले की मला 'सुरमणी' हा बहुमान मिळाला. त्या स्पर्धेने मला गाण्यावरचा आत्मविश्वास दिला.

दुसरी महत्त्वाची संधी म्हणजे, शोभाताईंनी अचानक सांगितले, "उद्या नेहरू सेंटरला माझ्या मागे तानपुरा घेऊन बसायचं आहे." माझ्यासाठी ही कल्पनाच दडपणाची होती. पण त्यांच्या विश्वासामुळे मी ती जबाबदारी पार पाडली. एका महान गायिकेच्या मागे बसणे हे स्वप्नसिद्धीपेक्षा कमी नव्हते! लोक म्हणतात, शास्त्रीय संगीत मागे पडत आहे. पण मला वाटते त्याचे स्वरूप बदलले आहे. पूर्वी करमणुकीसाठी वेळ, पैसा, जागा लागायची. आता ती मोबाईलवर क्लिकभरात मिळते. त्यामुळे शास्त्रीय संगीताची 'व्हॅल्यू' कमी झाली आहे, 'क्वालिटी' नव्हे. संयमाची कमतरता, जलद प्रसिद्धीचा हव्यास आणि स्पर्धात्मक विचारसरणी यामुळे शास्त्रीय संगीताचे धैर्यपूर्वक आकलन थोडे दूर गेले आहे. तरीही ज्यांना खरे संगीत अनुभवायचे आहे, त्यांच्यासाठी शास्त्रीय संगीत आजही एकमेव मार्ग आहे. उपशास्त्रीय शिक्षणाचे मार्गदर्शन शोभाताईंच्या ज्येष्ठ शिष्या शुभाताई जोशी यांच्याकडून घेत असल्याचे स्मिता भागवत यांनी सांगितले.

आजच्या विद्यार्थ्यांना टिकवणे हे गुरुचे खरे काम आहे. पालक आणि विद्यार्थ्यांच्या अपेक्षा वेगळ्या असतात. कलात्मक चातुर्याने त्यांना सुरुवातीला सोप्या बंदिशी, ओळखीची गाणी शिकवून रस निर्माण करावा लागतो. एकदा 'संगीताची मुंगी' चावली की मग काही सांगावे लागत नाही. धोंडूताई म्हणायच्या, "सर्वांना शास्त्रीय संगीत शिकता यावे असे मुळात वाटतच नाही आणि तसे झाले तरच त्याची दिव्यता टिकेल." रियाजाचे महत्त्व अनुभवातून समजते. स्टेजवर माती खाल्ली की रियाजाचा खरा अर्थ कळतो.

# कलेची साधना आणि समाजशील विचार



देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, या उक्तीप्रमाणे चित्रकार आणि कवयित्री आशा दोंदे यांनी त्यांच्या आयुष्यातून, त्यांच्या कलाकृतींतून आणि लिखाणातून समाजाला नेहमीच सकारात्मक विचार देण्याचा प्रयत्न केला आहे.

सध्या ७८ वर्षांच्या असलेल्या आशा दोंदे यांना लहानपणापासूनच चित्रकलेची आवड होती. त्यांना मुंबईच्या प्रसिद्ध जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये शिक्षण घेण्याची खूप इच्छा होती. काही कारणांमुळे ती पूर्ण होऊ शकली नाही, पण कला जिवंत ठेवण्यासाठी त्या नेहमीच प्रयत्नशील राहिल्या. आशाताईंची अपूर्ण इच्छा त्यांच्या मुलीने पूर्ण केली. मुलीने जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समधून प्रथम क्रमांक पटकावून शिक्षण पूर्ण केलं.



आशा दोंदे




लग्नाआधीपासूनच आशा दोंदे चित्रकलेचे वर्ग घेत होत्या. त्या काळात फॅब्रिक पेंटिंगचा ट्रेंड होता. त्यांनी एकदा सहजच कॅमल कंपनीच्या प्रदर्शनाला भेट दिली आणि त्यानंतर त्यांनी चित्र रंगवण्यास सुरुवात केली. सुरुवातीला साडी पेंटिंग केल्यावर त्यांनी फॅब्रिक पेंटिंगचे क्लासही सुरू केले. यानंतर त्यांनी ऑइल पेंटिंगकडे वळत स्वतःच्या अनेक कल्पना कॅनव्हासवर साकारल्या.

आशा दोंदे यांना व्यक्तिचित्रणात विशेष रुची नसली तरी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याप्रती मनात असलेल्या आदरामुळेच त्यांनी सावरकरांचे चित्र साकारले आहे. त्या सांगतात, "कागद हातात घेतला की लगेच चित्र पूर्ण होत नाही, आधी मनात विचारांचे चित्र रंगवावे लागते." त्यांचा निसर्गाकडे विशेष ओढा आहे. त्यांनी काढलेली बहुतांश चित्रे निसर्गाशी संबंधित आहेत.

शालेय जीवनात आशाताईंना कमते सर या शिक्षकांनी चित्रकलेसाठी प्रोत्साहित केले. त्या रांगोळीही उत्तम काढत असत. लग्नानंतर ठाण्यात आल्यावर त्यांचा अनेक चित्रकारांशी सुसंवाद झाला. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे तत्कालीन डीन, मूर्तिकार खानविलकर आणि पुजारे यांनीही त्यांना प्रोत्साहन दिले. जहांगीर आर्ट गॅलरी आणि नेहरू सेंटरला त्या नियमित भेट देत असत.

आज त्या वयामुळे नियमित क्लासेस घेत नाहीत, पण मुलांसाठी वर्कशॉप आयोजित करतात. त्यांच्या सोसायटीत खूप मुले आहेत, त्यांच्यासाठी त्या मोफत वर्कशॉप घेतात. फॅब्रिक पेंटिंग, ग्लास पेंटिंग यांसारख्या अनेक प्रकारांमध्ये त्या मुलांना मार्गदर्शन करतात. पूर्वी त्या कॅमल कंपनीच्या सहकार्याने श्रीरंग सोसायटीमध्ये वर्ग घेत असत, आता त्या एव्हरेस्ट वर्ल्डमध्ये वर्कशॉप घेतात.

चित्रकलेप्रमाणेच लेखनातही त्यांची रुची आहे. त्यांची "अंकुर" आणि "वाहते लेखांची जुडी" ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. याशिवाय त्यांच्या अनेक कविताही विविध दैनिकांमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत.

कला ही जीवन समृद्ध करणारे माध्यम आहे, असे त्या सांगतात. त्यामुळे प्रत्येकाने आयुष्यात एकतरी कला अवश्य जोपासावी, हे त्यांचे जीवनप्रेरणादायी विचार आहेत. त्यांच्या चित्रांतून आणि कवितांतून उमटणारा विचारांचा प्रकाश अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

# 'आई शप्पथ' अभिनयाशी माझा 'पवित्र रिश्ता'

(पान १ वरून)

मानसी सांगते, "ती एक आई होती, पण तिचं आयुष्य केवळ मुलाभोवती फिरणारं नव्हतं. तिच्या स्वतःच्या आकांक्षा होत्या, विचार होते. तिने चुका केल्या, पण त्या स्वीकारून ती पुढे गेली. आमच्या पिढीच्या स्त्रिया स्क्रीनवर फक्त एक पात्र उभं करत नव्हत्या, त्या आपलं 'स्वत्व' मांडत होत्या. आपण केवळ पत्नी, आई किंवा मुलगी या पारंपरिक चौकटीत अडकून राहिलो नाही, तर आपण 'स्त्री' म्हणून आपलं स्वतंत्र अस्तित्व दाखवून दिलं," असे तिने नमूद केले.



झी टीव्हीच्या पहिल्या सॅटेलाइट डेली सोपचा भाग होऊन मानसी साळवी भारतीय दूरदर्शनच्या सुवर्णयुगाची साक्षीदार ठरली. मानसी म्हणते, "तेव्हा जाणवलंही नव्हतं की आपण काही अमरत्वाच्या दिशेनं चाललो आहोत. पण आता मागे वळून पाहिल्यावर जाणवतं, आपण त्या काळात इतिहास घडवला." आजही ती दूरदर्शनप्रती तेवढ्याच प्रेमाने आणि आदराने बोलते. "टीव्ही कधीच मरणार नाही," असे ती ठामपणे सांगते. "कोविडच्या कठीण काळातही टीव्हीच लोकांसोबत राहिला. टीव्ही फक्त करमणुकीचे साधन नाही, तर तो जगण्याचा भाग आहे." त्याचं एक खास नातं प्रेक्षकांपैकी अनेक आईंशी आहे. मानसी नम्रतेने म्हणाली, "त्या आया आता माझ्यासोबत मोठ्या झाल्या आहेत. त्या मला लेखी पत्र पाठवायच्या, भेटायला यायच्या. हा बंध अतिशय अर्थपूर्ण आणि भावनिक आहे."

"स्वतःला बाहेरून आणि आतूनही घडवा. टॅलेंट क्षणभरासाठी लक्ष वेधून घेतं, पण चांगलं व्यक्तिमत्त्व, सुसंस्कार आणि खरेपणा हेच तुम्हाला टिकवून ठेवतात." असा मोलाचा सल्ला मानसी साळवी नवोदित कलाकारांना देतात.

इतकी वर्ष सतत अभिनय करत राहण्यामागचं मनातलं उत्तर फार स्पष्ट आणि प्रभावी आहे, "तुमचं काम तुमच्या मूल्यांशी जोडलेलं असावं लागतं. प्रसिद्धी ही क्षणभंगुर आहे, ट्रेंड्स रोज बदलतात. पण जर तुम्ही प्रामाणिकपणे काम केलं, तर त्याचा आनंद आणि समाधान कायमच टिकतं." असे तिने सांगितले.

मानसी साळवीची कारकीर्द ही केवळ अभिनयाची कहाणी नाही; ती आहे संयमाची, सच्चेपणाची आणि मूल्याधारित जीवनाची. ती जेव्हा स्क्रीनवर येते तेव्हा ती केवळ भूमिका साकारत नाही, तर एका पिढीला प्रेरणा देते की यश हे केवळ चकाकीने मिळत नाही, तर त्यामागे असतो संयम, मेहनत आणि प्रामाणिकपणा.

# Vaishali Jain's odyssey paints art, heart, and fresh start





"When life gave me a blank canvas, I decided to paint my masterpiece." These powerful words beautifully encapsulate the inspiring journey of Vaishali Jain, the founder of Aakruti Arts and Crafts. For over 25 years, Vaishali has been nurturing creativity and healing through art, transforming not only her own life but also the lives of hundreds of students.

Art has been Vaishali's passion since childhood. After completing her graduation, she rekindled her love for drawing and painting. She began art classes at home with just a handful of students. The positive response encouraged her to grow this initiative, and what started with 7–8 students has now flourished into a thriving art institution.

Today, Aakruti Arts and Crafts operates out of two main locations, Bhandup and Thane, and teaches around 180 to 200 students across all age groups. From school children to homemakers and senior citizens, people come here not only to learn art but also to find a creative outlet, a community, and often, a form of therapy.

What makes Aakruti Arts special is the diversity of art forms taught and the values and vision behind it. Vaishali's journey is one of resilience. Having faced significant personal challenges, including a divorce at a young age, she found strength and solace in art. With the unwavering support of her mother, brother, and sister, she turned her passion into a purposeful profession. Her mission, "In Art You Name It, We Have It", reflects her belief that art is for everyone and every hand can create.

At Aakruti Arts, students are gently guided through structured techniques like sketching, shading, proportions, and colour theory while also being encouraged to express their imagination freely. Vaishali believes that "discipline is the brush and creativity is the paint," and they build artistic confidence together. The teaching methodology includes experiential learning such as outdoor painting

**Today, Aakruti Arts and Crafts is not just an art class but a nurturing space for healing, growth, and self-discovery. It stands as a testament to the power of passion and perseverance. Vaishali Jain's journey is a reminder that one can truly transform a blank canvas into a masterpiece of life with courage, community, and creativity.**



Vaishali Jain

sessions, art picnics, and live sketching that help students observe and connect with the real world.

From understanding shapes in nature to developing balance and symmetry, students start with foundational exercises that build strong technical and creative skills. In crafts, students work with various materials, learning the importance of sequence, patience, and precision. Vaishali always reminds her students: "Master the basics, and your imagination will have no limits." One of her most rewarding experiences is seeing a student's mindset shift from "I can't draw" to "Look what I created!" Many who enter her class doubting their abilities leave with newfound confidence and creativity.

Aakruti Arts offers many art styles, from traditional Indian art like Warli, Madhubani, Lippan, and Meenakari to contemporary mediums like resin art, abstract painting, and glasswork. Craft sessions include paper quilling, clay modelling, fabric painting, wall hangings, and seasonal decorations. These activities teach technical skills and produce tangible results that students cherish.

Vaishali ensures that Aakruti Arts also promotes responsible creativity. Many craft projects use recycled materials—plastic bottles become planters, newspapers turn into papier-mâché sculptures, and wine bottles are reborn as painted home décor. Through this, students learn the importance of sustainability and how art can contribute positively to the environment.

For younger children, utmost care is taken to ensure safety. Non-toxic materials, proper ventilation, and age-appropriate tools are used with supervision, creating a safe environment for fearless exploration. Beyond beauty, art and craft classes at Aakruti Arts build vital life skills. Activities improve fine motor development, hand-eye coordination, focus, and emotional expression. Art becomes a gym for growing minds and fingers, preparing students for life beyond the classroom.

Vaishali passionately believes art is a meaningful way to reduce screen time in today's digital world. Engaging children in creative expression improves their cognitive development, emotional well-being, and social interaction significantly.

# भावाभिनयाच्या साहाय्याने कथा नृत्य साकारणारी 'भावना'

भारतीय शास्त्रीय नृत्यप्रकारांमध्ये कथ्थक हा एक अत्यंत प्रभावी आणि सुंदर नृत्यप्रकार मानला जातो. कथ्थक म्हणजे कथा सांगून ही कथा नृत्याच्या माध्यमातून, भावाभिनयाच्या साहाय्याने रंगमंचावर साकारली जाते. या अद्वितीय नृत्यशैलीला समर्पित आणि जगभरात प्रसिद्ध असलेल्या नृत्यांगनांमध्ये भावना लेले यांचं नाव आदराने घेतलं जातं.

भावना लेले या अलीकडील काळातील प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना त्यांच्या बहुपर्यायी शैलीसाठी ओळखल्या जातात. नागपूरमध्ये एका महाराष्ट्रीयन कुटुंबात १९६७ साली भावना लेले यांचा जन्म झाला असून त्यांचे बालपण नाशिकमध्ये गेले. लहानपणापासूनच त्यांना नृत्याची गोडी होती. त्यांची आई शास्त्रीय संगीताच्या पार्श्वभूमीची असल्यामुळे घरातच कलांचा सुगंध होता. भावनाताईंना कथ्थक नृत्याची आवड होती. वयाच्या आठव्या वर्षी त्यांनी कथ्थकचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यांना नाशिकच्या गुरु संजीवनी कुलकर्णी यांच्याकडे प्रशिक्षण लाभले. त्यांनी गांधर्व महाविद्यालयातून कथ्थक नृत्य विशारद (पूर्ण) ही पदवी प्राप्त केली आहे. तसेच, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथून त्यांनी कथ्थक विषयात एम.ए.पदवी मिळवली आहे. गुरु संजीवनी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कथ्थकचे शिक्षण घेतले असून, पं. बिरजू महाराज आणि गुरु मुन्नालालजी शुक्ला यांसारख्या दिग्गज कलाकारांचे विशेष मार्गदर्शन त्यांना लाभले आहे, ही त्यांची भाग्यप्राप्ती मानली जाते.

भावना लेले एक प्रतिभावंत कथ्थक नृत्यांगना म्हणून उदयाला आल्या. त्यांच्या नृत्यात शुद्धता, सौंदर्य आणि सखोल भावाभिनय यांचा उत्तम संगम पाहायला मिळतो. १९९२ साली भावना लेले यांनी कलानंद ही

**भावना लेले यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यामध्ये एक्सलन्स पुरस्कार, तरंग रत्न पुरस्कार, शैलूशी पुरस्कार, नृत्य गौरव पुरस्कार, वुमन्स अचिव्हर्स पुरस्कार आणि सत्यभामा पुरस्कार यांचा समावेश आहे. त्यांच्या नृत्यकारकिर्दीला देश-विदेशात मान्यता मिळालेली असून त्या भारताच्या सांस्कृतिक राजदूत म्हणूनही काम करत आहेत. नृत्यासोबतच त्यांना लेखनाची देखील आवड आहे. त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. कथ्थक दर्शन १ आणि कथ्थक दर्शन २ ही पुस्तके हिंदी भाषेत त्यांनी प्रकाशित केली आहेत.**








भावना लेले

स्वतःची नृत्य संस्था सुरु केली. त्यांच्या नृत्यप्रस्तुतीमध्ये ताल, लय आणि भाव यांचा सुंदर समतोल असतो. त्यांनी अनेक देश-विदेशांमध्ये आपली कला सादर केली असून भारतातल्या प्रमुख नृत्य महोत्सवांमध्ये त्यांची नियमित उपस्थिती असते. खजुराहो, एलोरा, उड़ान आणि मुंबई फेस्टिव्हल यांसारख्या नृत्यप्रमुख कार्यक्रमांमध्ये त्यांनी आपल्या नृत्याने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यांनी आपली कारकीर्द विविध शहरांमधील सादरीकरणांपासून सुरू केली. पुणे, जळगाव, हैदराबाद, इंदूर, तिरुपती, नाशिक, मुंबई आणि ठाणे याबरोबर पॅरिस आणि थायलंड येथे त्यांनी विविध नृत्य सादरीकरणे केली आहेत. त्यांनी अनेक सोलो सादरीकरणे दिली आहेत तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेमार्फत आयोजित पं. राम मराठे संगीत समारोहात २००६ आणि २००८ मध्ये सहभाग घेतला आहे. त्यांनी संस्कार भारतीच्या गुरुपौर्णिमा उत्सवात देखील सादरीकरण केले आहे. २०१४ मध्ये पुण्यात झालेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाच्या कार्यक्रमातही त्यांनी सहभाग घेतला होता.

नृत्यकलेच्या प्रसारासाठी त्यांनी अनेक कार्यशाळा आणि सेमिनार्स घेतले आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असून, त्यांनी ठाण्याप्रमाणे पुण्यातही 'कलानंद' नृत्य संस्थेची शाखा स्थापन केली. ही शाखा त्यांची मुलगी पल्लवी लेले-निपुणगे या चालवत आहेत. या संस्थेमार्फत त्या नवोदित कलाकारांना व्यासपीठ, मार्गदर्शन आणि शास्त्रशुद्ध नृत्य शिक्षण देतात.

हे सर्व करताना २०१९ मध्ये त्यांना ब्रेस्ट कॅन्सरचे निदान झाले. त्यावेळी त्यांनी ठरवले की, जर यातून बाहेर पडले तर नृत्यासाठी जे जे काही करायचे राहून गेले आहे ते करायचे. नृत्याच्या ध्यासाने त्या या आजारातून बाहेर पडून जोमाने काम करीत आहेत. कथ्थक नृत्य अनेकांपर्यंत पोहोचावं यासाठी त्या प्रयत्नशील आहेत.

भावना लेले यांचं आयुष्य हे एका समर्पित कलाकाराचं प्रतीक आहे. त्यांनी केवळ एक नृत्यांगना म्हणून नव्हे, तर एक प्रेरणादायी गुरू, संशोधक आणि भारतीय संस्कृतीची वाहक म्हणूनही आपली छाप उमटवली आहे. कथ्थक नृत्याला आधुनिक पिढीपर्यंत पोहोचवण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

# रंग हे निसर्गाचे हास्य आहे - तन्वी पाटील

**चित्रकलेच्या माध्यमातून स्वतःच्या भावना, संस्कृती आणि अध्यात्मिक विचार व्यक्त करता येतात. निसर्गाचे हावभाव रंगांतून कागदावर आपण उतरवू शकतो असे तन्वी पाटील म्हणते. एक प्रतिभावान तरुण कलाकार असलेल्या तन्वीचे लहानपणापासून रंगांशी नाते आणि सर्जनशीलतेची आवड आज एक सशक्त अभिव्यक्तीच्या रूपाने प्रकट होते. अॅक्रेलिक रंगांच्या माध्यमातून चित्रकलेत निपुण असलेल्या तन्वीच्या चित्रांमध्ये भक्तिभाव, निसर्गसौंदर्य आणि सामाजिक जाणीव यांचा सुरेख संगम आढळतो. सोशल मीडियावर @tanvi_artwork या पेजद्वारे ती आपल्या कलाकृती रसिकांपर्यंत पोहोचवत असून, भविष्यात मोठ्या प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्याची तिची तळमळ आहे. अभ्यास आणि कला यांचा समतोल साधत तन्वीने एक प्रेरणादायी प्रवास सुरू केला आहे.**



**तुझी चित्रकलेची सुरुवात कशी झाली?**

- मी लहानपणापासूनच चित्र काढायला सुरुवात केली होती. रंग, रेषा आणि कल्पना या गोष्टी मला लहान वयातच खूप आकर्षित करायच्या. कोरोना काळात घरात वेळ मिळाल्यामुळे मी अधिक वेळ चित्रकलेला देऊ लागेल पण त्याचबरोबर अभ्यासही करत होते आणि तेव्हापासून खऱ्या अर्थाने माझा कला प्रवास अधिक सखोल झाला. रंगांशी खेळायला आणि काहीतरी सर्जनशील निर्माण करायला मला खूप आवडते.

**चित्रकलेच्या कोणत्या प्रकारात तुला काम आवडते आणि का?**

- मला चित्रकलेचे सगळेच प्रकार आवडतात पण सर्वात जास्त अॅक्रेलिक रंगांच्या माध्यमातून चित्र रेखाटायला आवडतात. अॅक्रेलिक रंग ठळक आणि टिकाऊ असतात. तसेच या रंगांनी रेखाटलेली चित्रे अधिक मनमोहक असतात.

**तुझी चित्रशैली कशी आहे, असे तुला वाटते?**

- भावनात्मक आणि भक्तिप्रधान असे माझ्या चित्रशैलीचे रूप आहे. मी पारंपरिक आणि आध्यात्मिक विषयांवर काम करताना रंगसंगती आणि तपशीलावर भर देते. "रंग हे निसर्गाचे हास्य आहे" हे माझे सिग्नेचर कोटेशन आहे, म्हणजेच निसर्गाचे सौंदर्य, आनंद आणि शांतता रंगांतून व्यक्त होते असे मला वाटते.

**तू रेखाटलेल्या चित्रांमध्ये काही विशिष्ट विषय किंवा संदेश असतो का?**

- हो नक्कीच. माझ्या चित्रांमध्ये बहुतेक वेळा निसर्ग, मानवी भावना आणि सामाजिक विचार यावर आधारित संदेश असतो. मला बऱ्याचदा चित्रातून काही सांगायचं असतं जसं की शांतता, नातेसंबंध किंवा एखादी सकारात्मक भावना.

**एखाद्या चित्राची कल्पना सुचल्यापासून चित्र पूर्ण होईपर्यंतचा प्रवास कसा असतो?**

- सुरुवातीला मनात एक कल्पना येते. मग मी त्यावर थोडा विचार करून ती प्रत्यक्षात उतरवते आणि साधारण स्केच तयार करते. नंतर रंग निवडताना मी भावनांनुसार रंगसंगती ठरवते. संपूर्ण प्रक्रिया मनाला खूप आनंद देणारी आणि ध्यानासारखी वाटते.

**कोणत्या कलाकाराची चित्रे तुझ्या या प्रवासात तुला प्रभावी ठरतात?**



तन्वी पाटील

- माझ्या कुटुंबियांचा आणि काही प्रसिद्ध भारतीय कलाकारांचा प्रभाव माझ्यावर आहे. विशेषतः राजा रविवर्मा तसेच सोशल मीडियावरील अनेक युवा कलाकारांकडुनही खूप काही शिकायला मिळते. मला माझ्या कलेच्या क्षेत्रात कुटुंबियांची भरभक्कम साथ आहे.

**तू रेखाटलेल्या चित्रांचे प्रदर्शन कुठे मांडले आहे का?**

- सध्या माझी चित्रे मी @tanvi_artwork या इंस्टाग्राम पेजवर शेअर करते. पण भविष्यात प्रदर्शनात भाग घेण्याची इच्छा आहे.

**सध्या तू कोणत्या प्रकल्पावर काम करत आहेस?**

- सध्या मला आलेल्या ऑर्डरनुसार मी शिवाजी महाराजांचे कॅनव्हास पेंटिंग अॅक्रेलिक रंगांच्या माध्यमातून तयार करत आहे. तसेच मी Youth Festival of Mumbai University च्या झोनल राउंडसाठी प्रॅक्टिस करत आहे. त्यात मी रांगोळी स्पर्धेत देखील भाग घेतला आहे. याआधी मी श्रीकृष्णाची भित्तीचित्र आणि श्री स्वामी समर्थांची कॅनव्हास पेंटिंग तयार केली आहे, जी मी माझ्या इंस्टाग्राम पेजवरही अपलोड केली आहेत.
















# नृत्य आहे जीवनाचे सुंदर रूप-गुरु के. शोभना

नृत्यविश्वात आपली खास ओळख निर्माण करणाऱ्या गुरु के. शोभना यांचा नृत्यप्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. शालेय जीवनातच त्यांना नृत्याची आवड निर्माण झाली होती. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग, नृत्याचं नियोजन आणि सादरीकरण या साऱ्यामुळे त्यांचं नृत्याविषयीचं आकर्षण अधिकच गडद झालं. मात्र, त्या काळात विविध नृत्यशैलींची माहिती मिळवणं हे तितकंसं सोपं नव्हतं.

मध्यमवर्गीय कुटुंबातील असल्यामुळे आणि घरात तसे कुणीही कलाक्षेत्राशी जोडलेले नसल्यामुळे शास्त्रीय नृत्याशी संपर्क नव्हता. तरीही कल्याण परिसरातील 'मणी मास्टरजींच्या' भरतनाट्यम वर्गातून त्यांना शास्त्रीय नृत्याची पहिली ओळख मिळाली. नंतर त्यांनी 'नालंदा नृत्यमहाविद्यालयात' प्रवेश घेऊन बीएफए शिक्षण पूर्ण केले. आई-वडिलांचा पाठिंबा आणि स्वतःच्या जिद्दीच्या बळावर त्यांनी स्वतःचा मार्ग शोधत व्यावसायिक नृत्यसृष्टीत पाऊल टाकलं.



शाळेपासूनच सादरीकरणाची सवय असली तरी नृत्यमहाविद्यालयात गुरु डॉ. कनक रेळे यांच्या मार्गदर्शनाखाली जेव्हा त्यांनी व्यावसायिक पातळीवर नृत्य सादर केलं, तेव्हा त्यांना खऱ्या अर्थाने नृत्याच्या सूक्ष्म पैलूंशी ओळख झाली. व्यावसायिक नृत्यांगना म्हणून जबाबदारी घेत सादरीकरण करणं, त्यामागचा तपशील, मेहनत आणि सातत्य हे त्यांनी आत्मसात केलं. पुढे 'नालंदा भरतनाट्यम नृत्य निकेतन' ही स्वतःची संस्था स्थापन करून त्यांनी सादरीकरण आणि प्रशिक्षण दोन्ही क्षेत्रात कार्य सुरू ठेवले.

गुरु शोभना यांच्यासाठी नृत्य ही केवळ एक आवड किंवा करिअर नसून, ते त्यांचं संपूर्ण आयुष्य आहे. नृत्य हे त्यांच्यासाठी व्यायामाचं, मन:शांतीचं आणि आत्मसंपन्नतेचं माध्यम आहे. ही कला त्यांना शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती देते, तसंच त्यांना व्यक्त होण्याची एक गहन भाषा प्रदान करते. ४७ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मंचांवर सादरीकरण केले आहे. अनेक वेळा तांत्रिक अडचणी, वेळेअभावी बदल, वेशभूषेतील अडथळे अशा अडचणींना सामोरं जावं लागलं. मात्र प्रत्येक वेळेस त्यांनी संयमाने आणि सर्जनशीलतेने उत्तर दिलं. त्यांच्या मते, रंगभूमीसाठी कोरिओग्राफी करणं आणि ती कल्पना प्रत्यक्षात साकार करणं, ही अत्यंत समाधानकारक गोष्ट आहे.



"स्वतःच्या कलेशी प्रामाणिक राहा", असा संदेश गुरु शोभना आताच्या तरुण नृत्यप्रेमींना देतात. सोशल मीडियाच्या युगात इतरांशी तुलना करण्यापेक्षा स्वतःच्या गतीने आणि समर्पणाने प्रगती करणं महत्त्वाचं आहे. प्रसिद्धीपेक्षा शुद्ध कला आणि निष्ठा



गुरु के. शोभना

अधिक आवश्यक आहे. त्यांच्या मते, सोशल मीडिया हे एक प्रभावी माध्यम आहे. त्यातून अनेक छोट्या गावांतील कलाकार आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचू शकतात. विविध शैलींचा अभ्यास शक्य होतो. मात्र, याचा वापर केवळ प्रसिद्धीसाठी न करता, सखोल अभ्यासासाठी करणे अधिक गरजेचे आहे. कला टिकवणं, तिचा सन्मान राखणं आणि योग्य सादरीकरण करणं हेच कलाकाराचं कर्तव्य आहे.



**“ अधिकाधिक लोकांपर्यंत नृत्य पोहोचवणे हे गुरु शोभना यांचे पुढील काळातील ध्येय आहे. वयाच्या कोणत्याही टप्प्यावर असलेल्या व्यक्तींना नृत्याशी जोडणं, नृत्याला एक 'भाषा' म्हणून लोकांसमोर मांडणं आणि विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास, अभिव्यक्ती आणि सौंदर्य विकसित करणं हेच त्यांचं जीवनध्येय आहे. साध्या शालेय विद्यार्थिनीपासून एक जागतिक दर्जाची नृत्यांगना, शिक्षिका आणि मार्गदर्शक होण्यापर्यंतचा गुरु के. शोभना यांचा प्रवास प्रेरणादायी आहे.**

# Celebrating the Golden Jubilee of Dancing Bliss

**(From Pg. 1)**

Later, Vaishali also learnt swimming, which would add to her repertoire. To her surprise, S.D. Narang offered her Anmol Moti, a predominantly underwater movie, but due to her nuptials, Irani backed out, and the movie was then presented to Babita. Similarly, she had to refuse Subodh Mukherjee and the RK banner.

Vaishali starred in Ramraj Nahata's Raaton Ka Raja and S.S. Vasan's Teen Bahuraniyan. Vasan's Gemini Pictures offered her another two movies, but she could not do the same due to her wedding.

Just before marriage, Vaishali featured in just one movie: Chowkidar. Vaishali recalls, "Sohanlal Masterji and Shyam Ralhan came home one night and requested my mother if I could do one classical number in the movie. My mother tried to convince them that I had long decided to bid adieu to movies. But the duo was hell-bent to cast me in that song. With due respect to both these gentlemen, I agreed."

Apart from the films, Vaishali participated in various high-profile programmes, including the warfront show at Nathula Pass that was held in December 1968. "Sunil Dutt's Ajanta Arts Cultural Troupe wanted me to perform there. It was bone-chilling cold, and I was asked to perform in the snow. Dutt asked me to wear an overcoat and perform. However, Waheeda Rehman, a hardcore artist, ordered me to perform wearing just the dance costume and nothing else. I still remember that half an hour when I performed in that harsh cold. After the performance, my feet were numb, but my heart was happy. In the same show, Kishore Kumar was making his comeback; however, the weather got the better of him, and he could not perform," reminisces Vaishali.

To date, she has done thousands of shows in India and abroad. With movies and many stage shows to her credit, Vaishali hung up her boots as she tied the knot with her family friend Sarosh Irani, the owner of Prabhat Talkies in Thane, to unfurl a new beginning. Sitting at home was never an option, so Irani decided to take her passion to a new height.

Before starting her dance academy in 1972, Vaishali had been actively teaching dance since 1970. By the gracious presence of Nargis, Gopi Krishnaji, Shakila, Kammo, Shammiji, and many other stars, the institute was inaugurated in Thane. Every day, Vaishali put in dollops of hard work as she relentlessly worked from 9 am to 9 pm. From introducing crash courses in Kathak and Bharatnatyam to organising Group Arangetram, she refurbished the classical dance form and attracted many to it. The reason for introducing a crash course in Kathak and Bharatnatyam was that she realised that the girls these days are racing against time, and it is difficult for them to invest 7-8 years in learning these dance forms. That is why she brought about this welcome change of having a 3-4 year crash course. Another innovation that Irani introduced was the Group Arangetram. Typically, Arangetram is expensive and likely to burn a hole in one's pocket. With the Group Arangetram, Vaishali applied the principle of economies of scale as the cost was divided among multiple artists, and thus, it became reasonable for each. If Group Arangetram had not been introduced, I am afraid we would have lost such an incredible talent and, of course, many others who succumb to the financial pressures of performing an Arangetram," posits Irani. She mentions, "Two girls performed Arangetram almost free of cost as they were adjusted in a group. I must acknowledge the parents who allowed these girls to perform with their daughters."





She carried the bounty of experience she earned before 1970 and used it in her classes. Vaishali trained students in Holy Cross Convent High School and St. John the Baptist High School as her dance academy matured. She also opened a branch in Thane's Vrindavan society.

Vaishali, blessed with two daughters, Anaheeta, an LLB, and Namrata, who has pursued hotel management, is now handling the dance academy. Despite her busy schedule, the mother in Vaishali left no stone unturned in her daughters' upbringing. Both daughters are highly educated. However, the duo gave up their prolific jobs and chose to water the plant, the seeds of which were sown by their mother. Truly, the hand that rocks the cradle rules the world.

Another feather in Vaishali's hat is the charity shows she has organised since 2006. "When Nargisji was unwell, she expressed her need to have charity shows, the proceeds of which could go to cancer patients. Since the last 15 years, my team and I have been conducting charity shows as a tribute to Nargisji, one of the finest actors of all time," avers Vaishali. At present, both Vaishali's daughters, under their mother's able aegis, are running these shows.

Vaishali Irani concludes, "Dance is my oxygen and I cannot live without it. Dance is an art and a teacher, which teaches you many things. It develops your personality, gives you confidence, and I can vouch that a good dancer always stands out among the crowd."



# 'कोहम ते सोहम' योग, ध्यान आणि मी

**आता निश्चिंतीने पावलो विसावा |**
**खुंटलिया धांवा तृष्णेचिया||**

असे तुकोबा म्हणतात. खरी विश्रांती मनाला तेव्हाच मिळते जेव्हा मानसिक धावाधाव संपते, मानसिक श्रम थांबतात. गुरू जे करतील ते योग्य असा भाव असल्याने आंतरिक समाधान आणि कुठल्याही कारणाखेरीज मिळणार आनंद, चिदानंद असतो. तो खरा विसावा, ती खरी विश्रांती. त्यासाठी कठोर परिश्रम घेण्याची आपल्या पूर्वजांची तयारी होती. तप, ध्यान, नामस्मरण इत्यादी उपायांनी अंतिम ध्येय गाठायचे यामध्ये जीवनाची सार्थकता मानली जात होती. काळ बदलला तशा या संकल्पनांना फाटा दिला गेला आणि मानसिक अस्वस्थतेचे वारे जगभर वाहू लागले. आयुष्यातील समाधान हरपले. आज जगात मानसिक आजारांची संख्या लक्षणीय वाढत आहे.आजूबाजूला नजर टाकली तर दिसेल की अनेकजण अगदी क्लिनिकल पेशंट म्हणजे वैद्यकीयदृष्ट्या आजारी सिद्ध झालेले नाहीत पण मानसिक असंतुलनाचे बळी नक्कीच आहेत. नीट पाहिले तर आपण स्वतःही कधीकधी त्या रांगेत उभे असलेले दिसेल. का होत आहेत अनेक लोक आज असे 'दुश्चित्त'? माहिती तर खूप आहे आज सर्वांना. आपला मार्ग आपल्या अंतरात्म्याला चांगला ठाऊक असतो, पण आपण त्याला सोडून जगभर विचारत फिरत असतो.

**अखंड सावधान असावें ।**
**दुश्चित्त कदापि नसावें।**
**तजविजा करीत बसावें ।**
**एकांत स्थळी ॥**

असे समर्थांनी स्पष्टपणे सांगितले आहे. एका ठिकाणी स्थिर बसून स्वतःचे अवलोकन करणे, आपल्या दिवसाचे, आपल्या वागण्याचे त्रयस्थ भूमिकेतून निरीक्षण करणे फार आवश्यक आहे. त्यातून आपली ओळख होते, आपले बरे-वाईट सगळे दिसते. आपण स्वतः स्वतःला कधीही पाहू शकत नाही. त्यासाठी आपल्याला प्रतिबिंबावर अवलंबून राहावे लागते. 'मी कशी आहे' याचे उत्तर त्यामुळे कदाचित आपण दुसऱ्यांच्या डोळ्यांत शोधत असतो. कारण आपण आपल्या डोळ्यांनी आपल्याला आरसा असल्याशिवाय पाहूच शकत नाही. त्यासाठी अंतर्चक्षू उघडावे लागतात. स्वतःची भूमिका सोडून कुठल्याच भूमिकेत न शिरता आपण पाहिले की घडलेल्या गोष्टी एका वेगळ्या प्रकाशात दिसतात. जाणिवेचा स्तर उंचावतो. त्यानुसार आपली विचारपद्धती, काम करण्याची पद्धत सगळे बदलते. अनेक गोष्टी सोप्या होऊन जातात, कारण नजरेसमोरचे धुके फाकलेले असते. अंतरीचा सूर्योदय झालेला असतो. यालाच हल्ली सेल्फ अवेअरनेस, माइंडफुलनेस वगैरे म्हणतात.

**प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थी पंचिकर्ण ।**
**माहावाक्याचें विवरण । करितां सुटे ॥**
**कर्म उपासना आणि ज्ञान ।**
**येणें राहे समाधान ।**
**परमार्थाचें जें साधन । तेंचि ऐकत जावें ॥**

संसारी माणसाला प्रपंच तर केलाच पाहिजे, त्यासाठी कामधंदा केला पाहिजे, पैसा जोडला पाहिजे, समाजात वावरले पाहिजे. श्वास सुरु आहे तोवर कर्म तर सुटणार नाही. आयुष्यात पहिली काही वर्षे अभ्यास त्यानंतर नोकरी, संसार इत्यादी यामध्ये जातात. मौजमजा अधूनमधून चालूच असते पण काम करावेच लागते. पण हे सर्व करतांना लक्ष मात्र ध्येयावर केंद्रित पाहिजे. संसारातील सुखदुःखे येतील आणि जातील, पण 'मी कोण आहे' हा महावाक्यांचा शोध आपल्याला आंतरिक बळ देत राहील. सर्व मानसिक समस्यांवर मात करण्यासाठी आंतरिक शक्ती असणे महत्वाचे आहे. ती आतील शक्ती माणसाला उन्मळून पडण्यापासून वाचवते. त्यासाठी तुम्हाला आवडणारी कुठलीही साधना नियमित करणे आवश्यक आहे. ओंकार, जप, डोळे मिटून नामस्मरण, एका मंत्रावर किंवा ज्योतीवर लक्ष केंद्रित करून ध्यान, आवडते संगीत ऐकत स्थिर बसून ध्यान,



आरती भार्ज

रेकार्ड ऐकून त्या सूचनेबरहुकूम मनाला लावलेली शिस्त, श्वासाबरोबर ध्यान... किती पद्धती म्हणून वर्णाव्या? जी आवडते ती एक पद्धत निवडून त्याचा रोज अभ्यास करावा, त्याची नीट ओळख करून घ्यावी. समाधानी जगण्याचे मूलमंत्र आपल्या पूर्वजांनी आपल्याला कधीच सांगून ठेवले आहेत. 'विचारे मनातूंचि शोधूनि पाहे' असे शेकडो वर्षांपूर्वी समर्थ सांगून गेले. स्वतःबरोबर थोडा वेळ घालवा, स्वतःशी दोस्ती करा, आत्मशोधन करा. यातून आपल्याला कळते की काय सुधारणा मी घडवून आणू शकतो / शकते. ध्यानबीन करणे जमत नसेल तर काही करू नका, डोळे मिटून बसणे शक्य नसेल तर मिटूही नका. पण शांतपणे स्वतःकडे थोडे लक्ष तर द्या. आत्ता माझ्या श्वासाची गती काय आहे, माझ्या मनात काय विचार चालले आहेत, माझ्या मनात काय भावना उठत आहेत. योगासने, प्राणायाम, ध्यान, आत्मशोधन ही बाह्य साधनातून अंतरंगाध्ये उतरण्याची कला आहे. त्याची थोडी ओळख करून घेतली तर आयुष्यातील अनेक भार हलके होऊन जातील. त्यातूनच मी कोण आहे आणि मी इथे काय करत आहे ह्याचा शोध देखील लागेल.

**- आरती भार्ज**
**मानसिक विकास सल्लागार,**
**ध्यान प्रशिक्षक**
**9833793955 /**
**coachaartibharj@gmail.com**

# आदिवासी भागात आत्मनिर्भरतेची प्रगती

पालघर जिल्हा महाराष्ट्रातील एक आदिवासीबहुल परिसर आहे, तेथे अनेक कुटुंबे अजूनही आर्थिक दुर्बलतेशी झुंजत आहेत. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्य करणारी सेवा विवेक ही संस्था या भागातील महिलांना सक्षम करण्यासाठी आणि स्थानिक संसाधनांचा उपयोग करत रोजगारनिर्मिती घडवून आणण्यासाठी बांबू हस्तकला प्रकल्प हा एक अभिनव उपक्रम राबवत आहे. या उपक्रमामध्ये सेवा विवेक संस्थेच्या मुख्य सक्षमता अधिकारी प्रगती भोईर यांनी मोठे योगदान दिले आहे.

स्थानिक बांबूचा वापर करून उपयुक्त व आकर्षक हस्तकला वस्तू तयार करणे हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. पारंपरिक कौशल्याला आधुनिक डिझाइन आणि मार्केटिंगचे स्वरूप देत या प्रकल्पाने केवळ उत्पादन नव्हे तर सशक्तीकरणाचा एक संपूर्ण मार्ग आखला आहे. या प्रकल्पाचा उद्देश म्हणजे आदिवासी महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे.

प्रगती भोईर यांनी या उपक्रमाची संकल्पना केवळ प्रशिक्षणापुरती न ठेवता, ती व्यवस्थित उत्पादन, दर्जा नियंत्रण, विपणन आणि विक्री यामध्ये रूपांतरित केली आहे. हा केवळ छोटेखानी प्रशिक्षण उपक्रम न राहता, त्यातून एक सशक्त आर्थिक मॉडेल तयार व्हावे हा या उपक्रमामागील उद्देश होता. स्थानिक महिलांना प्रगती भोईर यांच्या नेतृत्वाखाली बांबूच्या विविध प्रकाराच्या वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले जाते. उदा. लॅंप शेड, पेन स्टॅंड, फुलदाणी, डेकोरेटिव्ह आयटम, पारंपरिक कंटेनर्स, इत्यादी. या वस्तू केवळ सौंदर्यवर्धक नसून व्यवहार्य आणि पर्यावरणपूरक देखील आहेत. बाजारपेठेची गरज ओळखून त्यांनी उत्पादनात नाविन्य आणले आणि विक्रीसाठी मुंबई, ठाणे, पुणे अशा शहरी भागात प्रदर्शनांचे आयोजन केले. या प्रकल्पाची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे महिलांना स्वावलंबी बनवणे.





प्रगती भोईर

**सेवा विवेक संस्थेचा हा उपक्रम हे दाखवून देतो की, जर सामाजिक कार्याचा पाया विचारपूर्वक आणि समुदाय-केंद्रित असेल तर समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. प्रगती भोईर यांचे योगदान या बदलामागे अत्यंत महत्त्वाचे असून त्यांनी आदिवासी महिलांना फक्त उदरनिर्वाहाचे साधन नाही, तर आत्मसन्मानाची आणि सर्जनशीलतेची नवी दिशा दिली आहे.**

प्रशिक्षणादरम्यान त्यांना आर्थिक साक्षरतेचे शिक्षण, बचत गटांची माहिती आणि स्थानिक संस्थांशी जोडले जाण्याची संधी दिली जाते. काही महिलांनी तर आपले छोटे व्यवसाय सुरू केले असून त्या आता इतर महिलांना देखील प्रशिक्षित करत आहेत. हे म्हणजे खऱ्या अर्थाने समुदायाभिमुख विकासाचे उदाहरण ठरते.

प्रगती भोईर यांची कामाची पद्धत अत्यंत सूक्ष्म, व्यावहारिक आणि प्रेरणादायी आहे. त्यांनी महिला सहभागींच्या सामाजिक, कौटुंबिक अडचणी समजून घेत त्या अनुषंगाने प्रशिक्षणाचे वेळापत्रक ठरवले. त्यांना आत्मविश्वास मिळवून दिला. काही महिलांना पहिल्यांदा गावाबाहेर प्रवास करण्याची संधी मिळाली. त्यातून त्यांचा दृष्टीकोन बदलला आणि त्यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला. आज या उपक्रमामुळे अनेक महिलांनी आपल्या कलेला ओळख दिली आहे. सेवा विवेक संस्थेच्या प्रयत्नामुळे आणि प्रगती भोईर यांच्या मार्गदर्शनामुळे या प्रकल्पाचा विस्तार झाला असून, आता हा प्रकल्प पालघरच्या पलीकडेही पोहोचत आहे. संस्थेचा उद्देश हा केवळ हस्तकला वस्तू विकणे नव्हे, तर एक प्रेरणादायी सामाजिक परिवर्तन घडवणे हा आहे.


















# Anandghana Art Festival set to cast monsoon musical magic

Cometh the monsoon, Hastkala, a household name in Thane and surrounding areas, brings the much-awaited Anandghana Art Festival. Anandghana is the harbinger of the monsoon and the auspicious month of Shravan.

In the past, Hastkala extended a heartfelt invitation to all the music lovers and connoisseurs to soak in the mellifluous voice of the critically acclaimed classical singer, Shri Rahul Deshpande and Arya Ambekar. Deshpande presented some of his beautiful musical collections from his YouTube channel - 'Rahul Deshpande Collective', and the



classic coalescence of Hindi and Marathi songs won the audience's hearts. Actor and Singer Arya Ambekar also enthralled the audience with her popular songs.

The programme garners tremendous response every year. Many distinguished dignitaries grace this event, and people eagerly await this three-hour-long musical rendezvous. While it rains outside, the audience inside the theatre is indubitably drenched in the sweet downpour. The skyline of Thane witnesses an enchanting rainbow, not made from seven colours, but from the seven musical notes that emanate from this art festival.

**This year marks a special milestone: Hastkala proudly celebrates its 30th anniversary, and the Anandghana Art Festival enters its fourth glorious year of promoting Indian culture, creativity, and tradition. The festival's highlight will be a live performance by renowned singer Priyanka Barve, who will mesmerise the audience with her soulful voice and captivating presence on stage. The event is scheduled for August 7 at Dr Kashinath Ghanekar Auditorium.**

